I/131155/2023

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९
दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७४४/२५८७२९ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/वशी-लेखा/2508/२०२३
दिनांक- - 9 OCT 2023

प्रति,
मे.-----------------------------------------------
-----------------------------------------------
-----------------------------------------------
-----------------------------------------------

**विषयः- लेखाशाखेकरिता कापड विक्री व देणगी पावती छपाईकामी...
दरपत्रक मागणी..**

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेप्रमाणे पावत्या छपाईकामी दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर छपाईसाठी खालीलप्रमाणे अटी/शर्ती राहतील.

अटी/शर्ती –

१. सदर पत्रासोबत दर भरणेसाठी फॉर्म जोडला आहे. त्यामध्ये दर भरुन खाली आपला शिक्का मारुन त्यावर स्वाक्षरी करावी व हा फॉर्म सीलबंद पाकीटात सादर करावा.
२. पुरवठा करावयाचे कापड विक्री व देणगी पावतीचे *Specifications* हे परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. ते विचारात घेऊनच दरपत्रक भरावे. मागणी केलेल्या पावतीचेच दर भरावेत. लेखाशाखेकडील उपलब्ध पावत्यांचे नमुने पाहूनच दरपत्रक भरावेत.
३. पावत्यांचे दर भरतांना *GST, GST-TDS*, सर्व प्रकारचे शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डीग, वाराई, हमाली खर्च तसेच संस्थानचे लेखाशाखा/ भांडार विभागात पोहोचचे खर्च, हे सर्व खर्च विचारात घेऊन दर नमूद करावेत. कुठलाही खर्च वेगळा आदा केला जाणार नाही.
४. परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे पावत्या पुरविण्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहील. पुरवठा आदेशाप्रमाणे पावत्यांचा पुरवठा न झाल्यास तो स्वीकारला जाणार नाही. तो तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. तो न नेल्यास त्याची नासधुस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.
५. सिलबंद पाकिटातील दरपत्रक शिर्डी येथे संस्थानच्या आवक विभागात विहीत वेळेत पोहचणे आवश्यक आहे. दरपत्रक देतांना "लेखाशाखेकरिता पावत्या छपाईचे दरपत्रक- (लेखाशाखा विभाग)" असा पाकिटावर स्पष्ट उल्लेख असावा.
६. ***तातडीची आवश्यकता असल्याने पावत्या पुरविणेचा कालावधी पुरवठा आदेश दिलेपासून प्रथम ५ दिवसांत १,००,००० पावत्या व पुढील प्रत्येकी ७ दिवसांचे कालावधीत ७०,००० नग पावत्यां याप्रमाणे पुरवठा पूर्ण करावा लागेल.***
७. पुरवठा करीत असलेले पावत्या संस्थानकडून *Randomly Sample* घेऊन स्वीकारले जातील. तथापी सदर पावत्या स्विकारलेनंतरही काही लॉट खराब आढळल्यास तो स्वखर्चाने बदलून द्यावा लागेल.
८. आपण पुरविलेले पावत्या संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून पावत्या खरेदी करावी लागल्यास, त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई संस्थानकडून आपणास देय असलेल्या इतर बिलातूनही वसूल केली जाईल.
९. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.
१०. पावत्या पुरवठा न झाल्यास अगर कमी दर्जाचे, वेगळ्याच प्रकारचे वा योग्य प्रतीचे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशा इतके पावत्या दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या पावत्यासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई, भरपाई आपले देय बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाला राहील.
११. दरपत्रकातील मंजूर दराने पावत्या पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने पावत्या पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा दरपत्रके मागणी



Scanned with OKEN Scanner

करुन खरेदी करावी लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

१२. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी दरपत्रकधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक पावत्याचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजूर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे.

१३. सदर दरपत्रकाचा वैधता कालावधी दरपत्रकाच्या अंतिम तारखेपासून १५ दिवसांचा राहील.

१४. कोणतीही दरपत्रके स्विकारणे/नाकारणे किंवा सर्व दरपत्रके नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

१५. पुरवठा केलेले पावत्या लेखाशाखा विभागाने स्विकारलेनंतर त्यांचे अभिप्रायानुसार साधारण ३० दिवसात बील आदा करण्याचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून आगाऊ रक्कम (अॅडव्हान्स) दिली जाणार नाही.

१६. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

१७. सदरचे दरपत्रक फॉर्म downloading साठी संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in वर उपलब्ध असुन अंतिम दि. १६ / १० /२०२३ पर्यंत मुदत देण्यात येत आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी व विहीत मुदतीत संस्थानला सीलबंद पाकीटात सदरचे दरपत्रक मिळेल अशा पध्दतीने सादर करावेत. उशिरा प्राप्त झालेले दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

१८. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. दरपत्रकधारकाची कोणतीही अट/अटी श्री साईबाबा संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही, अशी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

१९. शिर्डी संस्थान हे धर्मदाय ट्रस्ट असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.

Signed by
Tukaram Deoram Hulwale
Date: 07-10-2023 22:53:02

(तुकाराम हुलवळे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी



Scanned with OKEN Scanner

# SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI

## ANNEXURE FOR Printing of Receipts

| अ.नं. | छपाई तपशील | मागणी नग संख्या | परिमाण | दर प्रती नग | सर्व कर व खर्चासहित एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | संगणक प्रिन्टेड देणगी पावती- सिंगल, पेपर 80 GSM मध्ये, साईज (सेंमी मध्ये) १८×२५, कलरमध्ये, काऊन्टंर फाडणेसाठी परफोरेशन- नंबरींग आवश्यक- नमुन्याप्रमाणे | ४,००,००० | नग | | |
| २ | संगणक कापड विक्री पावती- कार्बन सह, 70 GSM, साईज (सेंमी मध्ये) २५×१५×२, कार्बनसह डयुप्लीकेट मध्ये, नंबरींग आवश्यक -नमुन्याप्रमाणे | १,००,००० | नग | | |
| | | | | एकूण रक्कम रुपये | |

पुरवठादाराचे सही



Scanned with OKEN Scanner